विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर

दिल्ली गेट जवळ, फाजिलपुरा, छ.संभाजीनगर-431 001

विकसित भारत - रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) शाखा

दुरध्वनी क्र. ०२४०-२३३१४७२,२३५२३७३ ईमेल- egsdc.aurangabad-mh@gov.in

जा.क्र.२०२६/रोहयो/जन-४/लेखा/वाहन निविदा/कावि- दिनांक २०.११.२०२६

दरपत्रक नोटीस

प्रति,

विषय :- सह आयुक्त, रोहयो शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयासाठी ११ महिने कालावधीसाठी वाहन चालकासह वाहन भाडयाने (मासिक) उपलब्ध करुन देण्याबाबत.

उपरोक्त विषयान्वये कळविण्यात येते की **सह आयुक्त, विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) शाखा,** विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयासाठी ११ महिने कालावधीसाठी वाहन चालकासह **KAI CARENS / MARUTI DZIRE** हे डिझेल / पेट्रोल वर चालणारे वाहन मासिक भाडेतत्वावर उपलब्ध करुन देण्याबाबतचे दरपत्रक मोहोरबंद लिफाप्यात मागविण्यात येत आहेत.

निविदा धारकास निविदेसोबत रु.२०,०००/- एवढ्या रकमेचा धनादेश सह आयुक्त (रोहयो), छत्रपती संभाजीनगर यांचे नावे बयाणा रक्कमेपोटी सादर करावा लागेल. तसेच निविदा शुल्क रु.४,०००/- इतक्या रकमेचा धनाकर्ष वेगळ्याने सादर करावा लागेल.

तरी इच्छूक संस्थेने दिनांक २०.११.२०२६ पासुन २७.११.२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत सह आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, दिल्ली गेट, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास समक्ष सादर करावी.

प्राप्त झालेले दरपत्रके दिनांक ३०.११.२०२६ रोजी दुपारी १२:०० वाजता उपस्थित दरपत्रक धारकांच्या समक्ष उघडण्यात येतील. तसेच टपालाने प्राप्त होणाऱ्या / झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

तसेच दरपत्रक स्विकारण्याचे किंवा नाकारण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीतांना राहतील. दरपत्रकासंबंधातील सविस्तर अटी व शर्ती या सोबत जोडण्यात आले आहेत.

(**सर्जेराव सोनवणे**)
सह आयुक्त (विकसित भारत-
रोजगार व आजीविका हमी अभियान
(ग्रामीण), छत्रपती संभाजीनगर

प्रत,

१. एन. आय. सी. छत्रपती संभाजीनगर यांना देऊन कळविण्यात येते की, वरील दरपत्रकास विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांच्या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यात यावी.
२. नोटीस बोर्ड

विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर कार्यालयासाठी **विकसित भारत-रोजगार व आजीविका हमी अभियान (ग्रामीण) शाखा**, अंतर्गत कामांच्या तपासणी करण्यासाठी लागणा-या KAI CARENS / MARUTI DZIRE हे डिझेल / पेट्रोल वर (दोन्ही पैकी एक) चालणा-या वाहनाकरीता सन २०२६-२७ या वर्षाकरीता खालील नमूद तपशिलाप्रमाणे विहीत प्रपत्रात मासिक भाडेतत्वावरील वाहनासाठी निविदा धारकाकडुन मोहोरबंद लिफाफापत्रातील दरपत्रकाद्वारे निविदा मागविण्यात येत आहे.

तरी इच्छूक संस्थेने दिनांक २०.११.२०२६ पासुन २७.११.२०२६ **रोजी** सायंकाळी **०५:००** वाजेपर्यंत सह आयुक्त (रोहयो), विभागीय आयुक्त कार्यालय, दिल्ली गेट, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयास समक्ष सादर करावी.

प्राप्त झालेले दरपत्रके दिनांक **३०.११.२०२६** रोजी दुपारी **१२:००** वाजता उपस्थित दरपत्रक धारकांच्या समक्ष उघडण्यात येतील. तसेच टपालाने प्राप्त होणाऱ्या / झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

या निविदेमध्ये सहभागी असणारे निविदाकार दरपत्रक उघडण्याच्या दिवशी उपस्थित राहू शकतील.

वाहन मासिक भाडेतत्वावर लावण्यासाठी निविदा धारकाने विहीत केलेल्या नमुन्यामध्ये त्यांचे दर भरणे बंधकारक राहील. **मोहोरबंद लिफाफ्यामध्ये पुढील कागदपत्रे जोडणे बंधनकारक राहील. ज्या निविदा धारकांची कागदपत्रे अपूर्ण असतील, त्यांना अपात्र ठरविण्यात येईल.**

१) प्रपत्र क्र.१ मधील नमून्यात चेकलिस्ट भरुन स्वाक्षरीकरुन जोडावे.

२) सोबत जोडलेला प्रपत्र क्र.२ मधील माहिती सादर करावी.

३) निविदाधारक हा वाहने पुरवठा करणारी ट्रॅव्हल्स एजन्सी असल्याबाबत पुरावा सादर करावा लागेल

४) पॅन कार्ड व जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.

५) मुंबई दुकाने व संस्था अधिनियमान्वये दुकान नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरणासह.

६) आयकर प्रमाणपत्र- मागील तीन वर्षाचे आयकर भरल्याचा पुरावा.

७) व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र व अद्यावत भरणा प्रमाणपत्र.

८) अनुभव प्रमाणपत्र- (संबंधित कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेले).

९) वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र – (सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र).

१०) प्रपत्र-३ मधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रपत्र-६ मधील नमुन्यातील हमीपत्र.

११) प्रपत्र-४ मधील नमुन्यात संस्थेच्या लेटरहेडवर काळया यादीत नाव नसल्याचे स्वस्वाक्षरीत घोषणापत्र.

१२) प्रपत्र-५ मधील नमुन्यात संस्थेच्या लेटरहेडवर संस्थेचे हितसंबंध व संघर्ष नसल्याचे स्वस्वाक्षरीत प्रमाणपत्र.

१३) निविदेसोबत पुढील नमुन्यात, संस्थेच्या लेटरहेडवर दरपत्रक स्वाक्षरीसह सादर करावे.

निविदाधारकांनी वाहन पुरविण्याचे दरपत्रक (सर्व कर, वाहन चालकाचे वेतन व इंधन ईत्यादीसह) (दोन्ही पैकी एक

मॉडेल (डिझेल/पेट्रोल)

अ. क्र.	वाहनाचा प्रकार	वाहनाची संख्या	१५०० कि.मी./ महिना पर्यंत एकत्रित दर (रु.)	१५०० कि.मी. वरील प्रति कि.मी. दर (रु.)
१	२	३	४	५
१	KAI CARENS (Monthly Basis)	१		
२	MARUTI DZIRE (Monthly Basis)	१		

(सर्जेराव सोनवणे)
सह आयुक्त (विकसित भारत-
रोजगार व आजीविका हमी अभियान
(ग्रामीण), छत्रपती संभाजीनगर

प्रपत्र क्र.१

KAI CARENS / MARUTI DZIRE दोन्ही पैकी एक मॉडेल भाडेतत्वावर घेण्याकरीता चेकलिस्ट

अ. क्र.	तपशील		जोडले आहे/नाही	पृष्ठ क्रमांक
१	निविदा धारकास निविदेसोबत रु.२०,०००/- एवढ्या रकमेचा धनादेश सह आयुक्त (रोहयो), छत्रपती संभाजीनगर यांचे नावे बयाणा रक्कमेपोटी सादर करावा लागेल. तसेच निविदा शुल्क भरलेबाबत पावती जोडावी लागेल.	अनिवार्य		
२	प्रपत्र क्र.२ मधील माहिती सादर करावी. त्यामध्ये नमूद कागदपत्रे PDF मध्ये अपलोड करणे	अनिवार्य		
३	निविदाधारक हा वाहने पुरवठा करणारी ट्रॅव्हल्स एजन्सी असल्याबाबत पुरावा.	अनिवार्य		
४	पॅन कार्ड व जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र.	अनिवार्य		
५	मुंबई दुकाने व संस्था अधिनियमान्वये दुकान नोंदणी प्रमाणपत्र नुतनीकरणासह.	अनिवार्य		
६	आयकर प्रमाणपत्र चा पुरावातीन वर्षाचे आयकर भरल्या मागील -.	अनिवार्य		
७	व्यवसाय कर नोंदणी प्रमाणपत्र व अद्यावत भरणा प्रमाणपत्र.	अनिवार्य		
८	अनुभव प्रमाणपत्र- (संबंधित कार्यालय प्रमुखाने प्रमाणित केलेले).	अनिवार्य		
९	वार्षिक उलाढाल प्रमाणपत्र – (सनदी लेखापालाचे प्रमाणपत्र).	अनिवार्य		
१०	निविदा शुल्क व बयाणा रक्कम भरण्यास सुट असल्यास तसे सक्षम प्राधिका-याचे प्रमाणपत्र PDF मध्ये अपलोड करावे.	अनिवार्य		
११	प्रपत्र-३ मधील अटी व शर्ती मान्य असल्याबाबतचे रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर प्रपत्र-६ मधील नमुन्यातील हमीपत्र	अनिवार्य		
१२	प्रपत्र-४ मधील नमुन्यात संस्थेच्या लेटरहेडवर काळया यादीत नाव नसल्याचे स्वस्वाक्षरीत घोषणापत्र	अनिवार्य		
१३	प्रपत्र-५ मधील नमुन्यात संस्थेच्या लेटरहेडवर संस्थेचे हितसंबंध व संघर्ष नसल्याचे स्वस्वाक्षरीत प्रमाणपत्र	अनिवार्य		

टिप :- निविदा धारकास निविदा सादर करतेवेळी उक्त तक्त्यामधील अ.क्र.१ ते १३ दर्शविण्यात आलेली सर्व अनिवार्य कागदपत्रे लिफाफ्यामध्ये स्वसाक्षांकित चेकलिस्ट अ.क्र. व पृष्ठ क्रमांकसह सुस्पष्ट झेरोक्स प्रती सादर करणे बंधनकारक राहिल.

दिनांक :-

ठिकाण :-

संस्थेचे नाव

सही

शिक्का

प्रपत्र क्र.२

KAI CARENS / MARUTI DZIRE दोन्ही पैकी एक मॉडेल भाडेतत्वावर लावणे करीता अर्ज

९. **अर्जदाराचे नाव** -

१०. **अर्जदाराचा कायमस्वरुपी पत्ता** -

११. **वाहना बाबत तपशील** -

(RC Book, Chesis No. Engine Number,

Fitness Certificate, PUC, वाहन चालकाचे लायसन्स etc

सोबत जोडणे)

(Innova Crysta Z model बाबत गाडी उपलब्ध

नसल्यास, गाडीचे Advance Booking केलेले

असल्यास ती पावती सोबत जोडावी)

१२. **वाहनाचे मॉडेल क्रमांक** -

१३. **वाहनाचे खरेदीचे कागदपत्रा बाबत तपशील** -

१४. **वाहनाचे विमा परवाना मुदत** -

१५. **वाहन कोणत्या वर्षाचे आहे त्या बाबत तपशील** -

१६. **उपलब्ध मनुष्यबळ** -

उपरोक्त सर्व माहिती खरी आहेचुकीची किंवा खोटी माहिती ही प्रकारची वाहना बाबत कुठल्यासदरच्या . दिल्याचे भविष्यात आढळून आल्यास माझ्यावर फौजदारी स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्याची आपणास संपूर्ण मुभा राहिल व त्या बाबत माझी कोणत्याही प्रकारची हरकत राहणार नाही.

आपला नम्र,

वाहन पुरवठाधारकाचे नाव व स्वाक्षरी

प्रपत्र क्र.-३

भाडेतत्वावर लावण्यासाठी अटी व शर्ती

१) ज्या निविदाधारकांचे दर मान्य होतील, त्यास वाहने पुरवठा करण्याच्या कामाचा करारनामा करतेवेळी विभागाकडे सुरक्षा ठेव ५ टक्के रक्कम रुपये ३५,०००/- सह आयुक्त (रोहयो), छत्रपती संभाजीनगर यांचे नावे राष्ट्रीयकृत बँकेच्या Fixed Deposit स्वरुपात भरणे बंधनकारक राहील.

२) ज्या वाहन पुरवठादाराचे दर मान्य होतील त्यांना रु.५००/- एवढ्या रक्कमेच्या स्टॅम्प पेपरवर लेखी करारनामा करुन द्यावा लागेल.

३) ज्या वाहन पुरवठादाराचे दर विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचेकडुन मान्य करण्यात येतील, त्यांना सदर दर करारनामा केल्याच्या दिनांका पासून ११ महिण्यापर्यंत बंधनकारक राहतील. दर अंतीम झाल्यानंतर कोणतीही दरवाढ कोणत्याही सबबीवर मान्य करण्यात येणार नाही.

४) भाडेतत्वावर पुरवठा करण्यात येणा-या वाहनास केंद्रीय वाहन अधिनियम १९८८ चे कलम ६६ नुसार परवाना प्राप्त असणे बंधनकारक राहील. करारनामा करतेवेळी सदरचे पुरावे वाहनासाठी सादर करावे लागतील.

५) एजन्सीचे स्वतःच्या मालकीचे किंवा मालकी हक्का व्यतीरिक्त इतरांचे वाहन पुरवठा करावयाचे झाल्यास संबंधीत मालकी हक्काचे पुरावे तसेच संबंधित वाहन मालकाचे नाहरकत शपथपत्र/ प्रमाणपत्र रु.१००/- च्या मुद्रांक स्टॅम्प पेपरवर स्वतंत्र सादर करवे लागेल. सदर प्रकरणी वाहनाची सर्वस्वी जबाबदारी पुरवठादार एजन्सीची राहील.

६) करारनामा कालावधीत वाहनास अपघात झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी एजन्सीची राहील. वाहनाचा ईंशुरन्स, विमा उतरविल्याचा पुरावा सादर करणे बंधनकारक राहील. (Third Party Insurance) या विमा पॉलीसीमध्ये गाडीमध्ये बसलेल्या अधिकारी/ कर्मचारी यांचा सर्वकष विमा असावा.

७) सदर वाहनांचा वापर छत्रपती संभाजीनगर विभागात, जिल्ह्यात, जिल्ह्याबाहेर, शहरात, ग्रामीण भागात किंवा डोंगराळ भागात केला जाणार असल्याने त्याबाबत एजन्सी, वाहन मालक, वाहन चालक यांची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

८) वाहनासाठीचे इंधन, वंगण, वाहन चालकाचे वेतन व भत्ते, वाहनाचे दुरुस्ती, रोड टॅक्स, पार्कींग, टोलटॅक्स इत्यादी सर्व खर्च वाहन पुरवठादार एजन्सीला करावा लागेल, त्यासाठी कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारची आगाऊ रक्कम दिली जाणार नाही.

९) वाहन नेहमी सुस्थितीत ठेवण्याची तसेच वाहन **२४** तास उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी पुरवठादार एजन्सीची राहील.

१०) पुरवठा करण्यात येणारे वाहन नादुरुस्त झाल्यास त्या वाहनाची किरकोळ दुरुस्ती एक दिवसात व मोठी दुरुस्ती तीन दिवसात पूर्ण करणे बंधनकारक राहील. या संबंधाने होणारी धावसंख्या या कार्यालयाच्या कामकाजाच्या धावसंख्येत समाविष्ठ करण्यात येणार नाही.

११) निविदा धारकाने **KAI CARENS / MARUTI DZIRE** मॉडेल या वाहनासाठी २००० कि.मी. प्रतिमाह धावसंख्येसाठी एकत्रित दर व त्यापुढील प्रत्येक कि.मी.साठी वेगळेदर दरपत्रकात दर्शवावीत.

१२) भाड्याने घेतलेल्या वाहनाची आवश्यकता नसल्यास कोणत्याही वेळी वाहन बंद करण्यात येईल. बंद झाल्याच्या तारखेपासून त्यांचे दायित्व विभागीय आयुक्त कार्यालयाकडे राहणार नाही.

१३) वाहनाची २००० कि.मी. पेक्षा कमी धावसंख्या झाल्यास त्यांना पूर्ण रक्कम अदा केली जाईल.

१४) वाहन मालकास वाहन नावावर असल्याबाबतचे कागदपत्रे व वाहन चालकांच्या परवाना असणे आवश्यक आहे (आर.सी. बुक, ड्रायव्हिंग लायसेंस, परमीट कागदपत्रे इ.)

१५) पुरवठा करण्यात येणारे वाहन हे व्यावसायिक परवाना असलेली वाहन पुरविणे आवश्यक आहे.

१६) निविदा धारकाची एकूण वार्षिक उलाढाल किमान रु.५० लक्ष असावी.

१७) निविदा धारकाचे भरलेले दर हे सर्व करासहीत असावेत.

१८) वाहन पुरवठ्याचे आदेश देण्यापूर्वी त्या वाहनाचे सर्व कागदपत्रे तपासण्यासाठी सादर करावे लागतील, त्यानंतर पुरवठा आदेश देण्यात येतील.

१९) वाहनाचा टॅक्स, विमा, पीयुसी, वाहन चालकाने लायसन्स वेळोवेळी अद्यावत नुतणीकरण करण्याची जबाबदारी वाहन पुरवठादार संस्थेची राहील.

२०) वाहन चालक/ मालक यांचे अकार्यक्षमतेमुळे वाहन बंद राहील्यास व कार्यालयाचे कामात अडथळा निर्माण झाल्यास निर्धारीत प्रतीमाह किमान भाडेवरुन प्रतीदिवस येईल, त्याप्रमाणे तेवढ्या दिवसाचे देयकांची रक्कम कपात करण्यात येईल.

२१) वाहन पुरवठा करणा-या एजन्सीला कार्यालयाकडुन कोणत्याही प्रकारची अग्रीम रक्कम दिली जाणार नाही.

२२) करार कालावधीमध्ये कार्यालयास शासनाकडुन वाहने उपलब्ध झाल्यास भाड्याने घेतलेली वाहने पूर्व सूचना न देता त्वरीत बंद करण्यात येतील.

२३) वाहनाचा गैरवापर झाल्याचे आढळून आल्यास किंवा वाहनाबाबत कार्यालयीन अधिकारी यांनी लेखी तक्रार केल्यास वाहन धावसंख्येत व लॉगबुकमध्ये फेरफार केल्यास पूर्व सूचना न देता वाहन त्वरीत बंद करण्यात येईल व नियमानुसार कायदेशिर व दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

२४) वाहन मुदतपूर्व बंद करावयाचे झाल्यास याबाबत वाहन पुरवठादाराने किमान दोन महिने अगोदर कार्यालयास लेखी नोटीस देणे बंधनकारक राहील.

२५) दर महिन्यास देयके सादर करतांना सोबत लॉगबुक पडताळणीस सादर करणे आवश्यक राहील. वाहनाचे लॉगबुकवर वाहन वापरणा-या अधिका-याची वेळोवेळी स्वाक्षरी घेणे बंधनकारक राहील. लॉगबुक सादर न करता देयके पारीत केली जाणार नाही. पुरवठाधारकाने वाहनाचे देयके त्या त्या विभागाकडे सादर करावेत.

२६) निविदेतील दर मान्य झाल्यापासून व करारनामा झाल्यापासून तात्काळ वाहने पुरविण्याची जबाबदारी एजन्सीची राहील. तसेच वेळोवेळी मागणी केल्यानुसार २४ तासाचे आत वाहन पुरवठा करण्याची जबाबदारी निविदाधारकाची राहील.

२७) वाहन पुरवठा संबंधाने प्रादेशिक परिवहन कार्यालयाने वाहने भाडेतत्वावर लावणे बाबत काही आक्षेप घेतल्यास अथवा कार्यवाही केल्यास त्याची पूर्ण जबाबदारी वाहन पुरवठादाराची राहील. अशा परिस्थितीत पूर्व सूचना न देता सदर वाहन बंद करण्यात येईल.

२८) भाडेतत्वावर घेण्यात आलेल्या वाहनाचे देयके कार्यालयाच्या निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्यात येतील. त्या बाबत निधी उपलब्ध नसतांना पुरवठादाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. देयकामधून नियमानुसार वजाती करण्यात येतील.

२९) पुरवठा करण्यात येणा-या वाहनाच्या चालकाची संपूर्ण माहिती व मोबाईल, फोन क्रमांक उपलब्ध करुन देणे बंधनकारक राहील.

३०) कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा कोणत्याही स्तरावर नाकारण्याचा / रद्द करण्याचा अधिकार निविदा समितीने राखून ठेवला आहे.

३१) स्वीकृत निविदा कालावधी **प्रथम ११ महिण्यासाठी राहिल**. उपकालावधीत वाढ करण्याबाबतचा निर्णय सह आयुक्त (रोहयो) यांचे संमतीने घेण्यात येईल.

३२) **KAI CARENS / MARUTI DZIRE** मॉडेलच्या बाबतीत जर Advance booking ची गाडी निविदाकार उपलब्ध करुन देणार असल्यास त्यांना कार्यारंभ आदेश मिळण्यापूर्वी सर्व अटींची पूर्तता करणे बंधनकारक राहील.

३३) भाड्याने घ्यावयाचे वाहन हे दिनांक ०१ जानेवारी, २०२२ नंतर प्रादेशिक परिवहन अधिकारी यांचेकडे नोंदणीकृत व उत्पादीत असावी. तसेच सदर वाहनांचे उत्पादन हे जानेवारी, २०२२ नंतर उत्पादीत असावे.

३४) महाराष्ट्र इलेक्ट्रीक धोरण २०२१ अंतर्गत कायार्लयास दिनांक ०१ एप्रिल २०२२ पासून बॅटवर चालणारे इलेक्ट्रीक वाहन उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. तसेच शासनाकडून महाराष्ट्र इलेक्ट्रीक धोरण २०२१ नुसार वेळोवेळी केलेले बदल लागू राहतील.

३५) या निविदा पत्रकातील बाबी संबंधी काही प्रकरणे न्याय प्रविष्ठ झाल्यास अथवा न्यायालयात जावे लागल्यास त्याचे कार्यक्षेत्र मर्यादा छत्रपती संभाजीनगर विभाग क्षेत्रापुरतीच मर्यादीत राहील.

३६) या व्यतीरिक्त शासन निर्णय उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-३/ उद्योग-४, दिनांक ०१ डिसेंबर, २०१६ मधील सर्व अटी व शर्ती या निविदेस लागू राहतील.

वरील प्रमाणे अटी व नियम मला मान्य आहेत.

निविदा धारकाची स्वाक्षरी व शिक्का

(सर्जेराव सोनवणे)
सह आयुक्त (विकसित भारत-
रोजगार व आजीविका हमी अभियान
(ग्रामीण), छत्रपती संभाजीनगर

प्रपत्र क्र.-४

काळ्या यादीत टाकले नसल्याचे हमीपत्र

मी श्री. ---------- या संस्था / फर्मचा मालक/ प्रो.पा. असून उप आयुक्त, रोजगार हमी योजना शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासाठी या ११ महिने कालावधीसाठी भाड्याने देण्याबाबतचे दरपत्रक सादर करीत असून, माझी संस्था / फर्मला यापुर्वी काळया यादीत टाकण्यात आलेली नाही. भविष्यात असे काही आढळयास मी कायदेशिर कार्यवाहीस पात्र राहील. याची मला पुर्ण जाणीव आहे.

करीता मी हे हमीपत्र लिहून देत आहे.

दिनांक :-

संस्थेचे नाव

सही

ठिकाण :-

शिक्का

प्रपत्र क्र.-५

संस्थेचे हितसंबंध व संघर्ष नसल्याचे प्रमाणपत्र

मी श्री. ---------- या संस्था / फर्मचा मालक/ प्रो.पा. असून ११ महिने कालावधीसाठी उप आयुक्त, रोजगार हमी योजना शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासाठी वाहन भाडयाने देण्याबाबतचे दरपत्रक सादर करीत असून, माझे किंवा माझ्या फर्मचे, खरेदी प्राधिकाऱ्यासोबत कोणत्याही प्रकारचे हितसंबंध व संघर्ष नाही. भविष्यात असे काही आढळल्यास मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहील. याची मला पुर्ण जाणीव आहे.

करीता मी हे प्रमाणपत्र लिहून देत आहे.

दिनांक :-

संस्थेचे नाव

सही

ठिकाण :-

शिक्का

प्रपत्र क्र.-६

निविदा धारकाचे हमीपत्र

मी श्री. ---------- खालील सही करणार, हमीपत्र लिहून देतो की, मी संस्था / फर्मचा मालक/ प्रो.पा. असून उप आयुक्त, रोजगार हमी योजना शाखा, विभागीय आयुक्त कार्यालय, छत्रपती संभाजीनगर या कार्यालयासाठी या ११ महिने कालावधीसाठी भाड्याने देण्याबाबतचे दरपत्रक सादर करीत असून, प्रसिद्ध निविदेमधील सर्व अटी व शर्ती काळजीपूर्वक वाचल्या असून त्या सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत. तसेच त्या माझ्यावर बंधनकारक राहतील.

३. निविदेमध्ये माझी व संस्थेबाबत दिलेली पूर्ण माहिती सत्य व बिनचुक आहे.

४. मी निविदेमध्ये चुकीची माहिती दिल्याचे अथवा आपली दिशाभुल केल्याचे दिसून आल्यास माझी निविदा फेटाळली जाऊ शकते. तसेच मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहिल याची मला पूर्ण कल्पना आहे.

५. निविदेबाबत काही तक्रार असल्यास कायदेशीर कार्यवाही औरंगाबाद जिल्हा न्यायालयीन कार्यक्षेत्रातच होईल.

६. दरकरार झाल्यानंतर कराराच्या कालावधीमध्ये मंजूर दराप्रमाणे आवश्यकतेनुसार वाहने पुरविण्याची याद्वारे मी हमी देतो.

दिनांक :-

संस्थेचे नाव

सही

ठिकाण :-

शिक्का